# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सायकांळ)

जा.क्र. ६६५/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ११/१०/२०१६

**१) तलावाच्या पाण्यात बुडुन इसमाचा मृत्यु . :–**

दिंनाक. १०/१०/२०१६ रोजी ०८.३० वा. दर. यातील मृतक गणेश मदन रेहपाडे वय ३० वर्ष रा. सावरी हा येथील दुकाणात खर्रा आनण्यास जातो म्हणुन घरून निघुन गेला आणि प्रोपेक्स तलावाच्या पाण्यात बुडुन मरण पावल्याने फिर्यादी सौ. शालु गणेश रेहपाडे वय ५० वर्ष रा. सावरी यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे जवाहरनगर येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. पाटील पो. स्टे. जवाहरनगर हे करीत आहेत.

**२) नदीच्या पाण्यात बुडुन युवकाचा मृत्यु . :–**

दिनांक १०/१०/२०१६ रोजी १३.१५ वा. दर. यातील मृतक सतिश विश्वनाथ कायरकर वय २२ वर्ष रा. पाउलदौना (बेलाटी) हा वैजेश्वर घाट येथे अस्थी विसर्जन पुजा कामी आला असता अस्थी विसर्जन कार्यक्रम आटोपुन गावातील लोकांसह वैनगंगा नदीचे पाण्यात आंघोळ करतांना अचानक पाण्याचे प्रवाहात वाहुन बुडुन मरण पावल्याने फिर्यादी संदिप विश्वनाथ कायरकर वय २५ वर्ष रा. पाउलदौना (बेलाटी) पो.स्टे. पालांदुर यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम १७४ जाफौ अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. गदादे पो.स्टे. पवनी हे करीत आहे.

**३) विष प्राशन करुन औषधउपचारा दरम्यान महीलेचा मृत्यु . :–**

दिंनाक. ०६/०९/२०१६ रोजी १३.०० वा. दर. यातील मृतक सौ. योगीनी योगेश केवट वय ३० वर्ष रा. खुर्शीपार ही दि. ०६/०९/२०१६ ला घरी कोणी हजर नसतांना थिमेंट नावाचे विष प्राशन करून उलटया करीत असतांनी मृतकचे पती याने तिला औषधोपचाराकरीता सा. रू. भंडारा येथे नेवुन प्रथम उपचार करून पुढील उपचारा करीता नागपुर मेडीकल कॉलेज येथे भरती करून उपचारा दम्यान मरण पावल्याने पो.स्टे. अजनी नागपुर येथे मर्ग क्र. ००/१६ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र पो.स्टे. भंडारा येथे प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. चोपकर यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे भंडारा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गिऱ्हेपुंजे पो. स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**४) प्रकृती खराब झाल्याने महीलेचा उपचारा दरम्यान मृत्यु . :–**

दिंनाक. २९/०९/२०१६ रोजी १५.३० वा. दर. यातील मृतक सौ. शोभा सुरेश शहारे वय ४० वर्ष रा. खमारी बुटी हिला पोळा सना अगोदर ताप आल्याने तिला दि. २६/०८/२०१६ रोजी डॉ. बंसोड रा. खमारी बुटी यांनी तिला कमरेच्या उजव्या भागात इंजेक्शन दिल्याने त्या ठिकाणी जखम झाली होती नंतर मृतक हीचा डॉ. हेडगे सा. रू. भंडारा व डॉ. डोकरीमारे भंडारा यांचे कडे उपचार करून नागपुर मेडीकल कॉलेज येथे वार्ड क्र. २० मध्ये भरती असतांना उपचारा दम्यान मरण पावल्याने पो.स्टे. अजनी नागपुर येथे मर्ग क्र. ००/१६ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र पो.स्टे. कारधा येथे प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. भुरले यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे कारधा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मनगटे पो. स्टे. कारधा हे करीत आहेत.

प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ९९२१७४१६८१

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता